| MHGA070005192022 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | १६.०६.२०२२ |
| नोंदणी तारीख | १६.०६.२०२२ |
| निकाल तारीख | ०५.०५.२०२६ |
| कालावधी | **०३ वर्षे १० महिने १९ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| **निशाणी –** | |
| **अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात, पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,** | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. **८९/२०२२** **अहेरी** पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | **दि.०५.०५.२०२६** |
| प्रकरण क्रमांक | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २४८/२०२२** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी,अहेरी,<br>(फिर्यादी पो.हवा. धर्माजी डोबा सिडाम) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपी | **संदिप मनोहर मडावी,**<br>वय ३० वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – गेर्रा, ता. अहेरी,<br>जिल्हा गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **विधीज्ञ श्री बंडू आत्राम**<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २२.०२.२०२२ |
| पहिल्या खबरीची तारीख | २२.०२.२०२२ |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

| | |
|---|---|
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १६.०६.२०२२ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | २०.१०.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | ०३.०७.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ०५.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५.०५.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संदिप मनोहर मडावी | -- | १६.०६.२०२२ | म.दा. प्र. अ. च्या कलम ६५(ई) अन्वये | **निर्दोष** | – | – |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्र.१ | धर्माजी डोबाजी सिडाम (**निशाणी १२ पुढे** ) | फिर्यादी |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. अभियोग पक्ष:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–१३**/स.सा.क्र.०१ | फिर्याद |
| २. | निशाणी **पी–१४**/स.सा.क्र.०१ | छापिल नमुन्यातील खबर |
| ३. | निशाणी **पी–१५**/स.सा.क्र.०१ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | निशाणी **पी–१६**/स.सा.क्र.०१ | मलमत्ता शोध व जप्तीचा नमुना |
| ५. | निशाणी **पी–१७**/स.सा.क्र.०१ | सि.ए.फार्म |

**ड. महत्त्वाच्या वस्तु:**

| अ.क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ८८/२०२१ | १० लिटर हातभटटी गुळामोहाची दारू |

## न्यायनिर्णय

(दिनांकः ०५ मे, २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दि.२२.०२.२०२२ रोजी संध्याकाळी ०७.३० ते ०८.३० वाजताच्या सुमारास मौजा गेर्रा, ता.अहेरी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घरी तिन काळया रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये ३० लिटर हातभटटी गुळामोहाची दारू विक्री करण्याकरिता मिळुन आला. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.१३ खाली नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.२२.०२.२०२२ रोजी संध्याकाळी ०७.३० ते ०८.३० वाजताच्या सुमारास मौजा गेर्रा, ता.अहेरी, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घरी तिन काळया रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये ३० लिटर हातभटटी गुळामोहाची दारू बाळगुन विक्री करण्याकरिता मिळुन आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |

२ आदेश ? आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली.

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र.१ करिताः</u>**

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने फिर्यादी यांना तपासण्यात आले.

३. सा.क्र.१ **धर्माजी डोबाजी सिडाम** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२२.०२.२०२२ रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. गुप्त माहितीनुसार ते मौजा गेर्रा येथील संदिप नावाचा व्यक्ती गुळामोहाची दाय विक्री करित आहे. अशा खबरेवरून स्टाफसोबत चौकशी केली असता आरोपीच्या ताब्यातुन एका प्लास्टीक कॅनमध्ये ३० लिटर हातभटटी मोहादारू मिळून आली. त्यांनतर मौका पंचनामा तयार केला आणि सि.ए.फार्म तयार केला. १८० मिली सि.ए.करिता वेगळी काढली. पंचाना बोलावून पंचनामा तयार केला व सि.ए.फार्म व दारू मुददेमाल घेवून पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली. त्यांना फिर्याद नि.क्र.१३ व छापील पहिली खबर नि.क्र.१४, घटनास्थळ जप्ती पंचनामा नि.क्र.१५ व मालमत्ता शोध जप्तीचा नमुना नि.क्र.१६ व सि.ए.फार्म नि.क्र.१७ तयार केला. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

४. सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने फक्त फिर्यादीला तपासले ते पोलिस कर्मचारी आहे. पुढे असे आहे की, तपासी अधिकारीची साक्ष नोंदविण्यात आली नाही. तपासी अधिकारी व इतर स्वंतत्र साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. सदर प्रकरणात जप्त केलेले द्रव्य गुळामोहाची दारु असल्याबाबतचा

दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हा सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**मुद्दा क्र. २ करिताः**

६. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

**आदेश**

१. आरोपी **संदिप मनोहर मडावी,** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपीचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपीने फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी रूपये ४५,०००/– चा जामीन दाखल करावा.

४. जप्त मुददेमाल नाश करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.05.05 17:40:11 +0530

(एस.एम.एच.शाहिद)

दि.०५.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी